(ग्रामविकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ९९/आस्था-८ दिनांक २० ऑगस्ट २०२१ चे सहपत्र)

विवरणपत्र अ

## जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील आरोग्य विभागाशी संबधित पदभरतीबाबत जाहिर प्रकटन

यापुर्वी माहे मार्च - २०१९ च्या जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत. :-

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील गट - क संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीसाठी माहे मार्च - २०१९ मध्ये शासनाच्या महाआयटी मार्फत महापोर्टलवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु तत्कालीन परिस्थितीत महापोर्टल बंद झाल्याने सदरची परिक्षा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. दरम्यान कोविड - १९ साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर तसेच इतर साथ रोगाची शक्यता लक्षात घेता ग्रामिण भागातील जनतेला तात्काळ आरोग्य सेवा मिळणे आवश्यक असल्याने ग्रामविकास विभागातंर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबधित आरोग्य सेवक (पुरुष) (४०% सरळसेवा), आरोग्य सेवक (पुरुष) (५०% हंगामी फवारणी कर्मचारी), आरोग्य सेविक (महिला), औषध निर्माता या संवर्गातील माहे मार्च - २०१९ मध्ये दिलेल्या जाहीरातीमधील नमूद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर जाहिरातीनुसार भरावयाच्या रिक्त पदांचा सुधारित तपशील खालील प्रमाणे आहे :-

### पदांचा तपशील

१) आरोग्य सेवक (पुरुष) (५० % टक्के हंगामी फवारणी कर्मचारी)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ३ | - | २ | - | - | - | ३ | १ | २ | ४ | १५ |
| सर्वसाधारण | ३ | - | २ | - | - | - | ३ | १ | २ | ३ | १४ |
| खेळाडु | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकूण | ३ | - | २ | - | - | - | ३ | १ | २ | ४ | १५ |

**०१)** उपरोक्त रिक्त १५ पदांपैकी ०१ पद दिव्यांगासाठी राखीव आहे. (A) LV : Low vision - ०१ पद

२) आरोग्य सेवक **(पुरुष)** ४० % टक्के सरळसेवा

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | - | - | - | - | - | - | ४ | १ | - | - | ०५ |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | ३ | १ | - | - | ०४ |
| खेळाडु | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | ०१ |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकूण | - | - | - | - | - | - | ४ | १ | - | - | ०५ |

दिव्यांगासाठी पदे निरंक

| ३) आरोग्य सेवक (महिला) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
| पदसंख्या | १३ | ५ | २ | २ | ४ | - | १७ | १ | ९ | ३७ | ९० |
| सर्वसाधारण | ९ | ३ | २ | २ | ३ | - | १० | १ | ७ | २२ | ५९ |
| खेळाडु | १ | - | - | - | - | - | १ | - | - | २ | ४ |
| माजी सैनिक | २ | १ | - | - | १ | - | ३ | - | १ | ६ | १४ |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | १ | - | - | २ | ३ |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| अंशकालीन | १ | १ | - | - | - | - | २ | - | १ | ४ | ९ |
| **अनाथ** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | १३ | ५ | २ | २ | ४ | - | १७ | १ | ९ | ३७ | ९० |

०१) उपरोक्त रिक्त ९० पदांपैकी ०४ पदे दिव्यांगासाठी राखीव आहेत. त्याचा तपशील पुढिल प्रमाणे आहे.

(a) Lv :- Low Vision (अल्पदृष्टी) -१ पद

(b) D :- Deaf (बहिरा), HH :- Hard of Hearing (कर्णबधीर)-१ पद

(c) OL :- One Leg (माहे मार्च, २०१९ मधील जाहिरातीमध्ये आरोग्य सेवक (महिला) पदासाठी OL दिव्यांगाच्या प्रवर्गाकरिता पदे दर्शविण्यात आली होती व संबधित दिव्यांग उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. शासन पत्र दि.२०/०८/२०२१ अन्वये सदरील OL दिव्यांगाच्या प्रवर्गाकरिता नव्याने अर्ज स्विकारले जाणार नाहीत)

CP: Cerebral palsy(मेंदुचा पक्षघात), LC :-Leprosy Cured (कुष्ठरोग मुक्त), Dw : Dwarfism (शारीरिक वाढ खुंटणे), AAV:- Acid Attack Victims (आम्ल हल्लाग्रसत) - १ पद

(d) SLD :- Specific Learning Disability (विशीष्ट शिक्षण अक्षमता, MI :- Mental Illenss (मानसिक आजार)

(e) MD :- Multiple Disabilities involving (a) to (d) above वरील अ ते ड मधील एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व (d व e पैकी ०१ पद)

| ४) औषध निर्माता | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
| पदसंख्या | - | - | - | - | - | - | १ | - | - | २ | ३ |
| सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | २ |
| खेळाडु | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भूकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **महिला** | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| **अनाथ** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **एकूण** | - | - | - | - | - | - | १ | - | - | २ | ३ |
| दिव्यांगासाठी पदे निरंक | | | | | | | | | | | |

**माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य विभागाशी संबधित पदांकरिता आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-**

१) माहे मार्च, २०१९ मधील जाहिरातीनूसार आरोग्य विभागाशी संबधित पदांकरिता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाऊन Login ID व Password create करणे आवश्यक आहे.

२) **दिव्यांगाच्या पदांबाबत विश्लेषण :-** A) माहे मार्च - २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये आरोग्य सेवक (महिला) या पदासाठी दिव्यांगाची एकुण पदसंख्या ०३ % प्रमाणे ०५ पदे (OL :- One Leg) दिव्यांग प्रवर्गाकरिता दर्शविण्यात आली होती तदनंतर दिव्यांगाच्या आरक्षणात शासन निर्णय दिनांक २९ मे २०१९ अन्वये रिक्त पदांच्या ०४% प्रमाणे सुधारित आरक्षण विहीत करण्यात आलेले आहे तसेच ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ अन्वये आरोग्य विभागातंर्गत दिव्यांगासाठी पदे सुनिश्चित करण्यात येऊन सदरील शासन निर्णयानुसार आरोग्य सेवक (महिला) या संवर्गात दिव्यांगासाठी एकुण ०४ पदे (a) Lv :- Low Vision -१ पद, (b) D :- Deaf, HH :- Hard of Hearing -१ पद, (c) OL :- One Leg (माहे मार्च, २०१९ मधील जाहिरातीमध्ये आरोग्य सेवक (महिला) पदासाठी OL दिव्यांगाच्या प्रवर्गाकरिता पदे दर्शविण्यात आली होती व संबधित दिव्यांग उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. **शासन पत्र** दिनांक २०/०८/२०२१ अन्वये सदरील OL दिव्यांगाच्या प्रवर्गाकरिता नव्याने अर्ज स्विकारले जाणार नाहीत) CP: Cerebral palsy, **LC** :-Leprosy Cured, Dw : Dwarfism, **AAV**:- Acid Attack Victims - १ पद, (d) **SLD** :- Specific Learning Disability, MI Mental Illenss, (e) MD :- Multiple Disabilities involving (a) to (d) above (d व e पैकी ०१ पद) सुधारित जाहिरातीत दर्शविण्यात आलेली आहेत. याबाबत सर्व संबधितानी नोंद घ्यावी.

B) तसेच माहे मार्च - २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये आरोग्य सेवक (पुरुष) ४०% सरळसेवा या पदासाठी ०२ पदे (OL :- One Leg) दिव्यांग प्रवर्गाकरिता दर्शविण्यात आली होती उक्त नमुद ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ अन्वये आरोग्य विभागातंर्गत दिव्यांगासाठी पदे सुनिश्चित करण्यात येऊन आरोग्य सेवक (पुरुष) ४०% सरळसेवा या पदासाठी (००) निरंक पदे दिव्यांगासाठी सुधारित जाहिरातीत दर्शविण्यात आली आहेत. त्यामुळे माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिरातीस अनुसरुन आरोग्य सेवक (पुरुष) ४०% सरळसेवा या पदासाठी दिव्यांग प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांनी वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावर इतर जिल्हा परिषदेचा विकल्प दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक आहे. याबाबत सर्व संबधित प्रवर्गातील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापूर्वी माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द जाहिरातीनूसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज सादर केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल.

४) माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य सेवक (पुरुष) (४०% सरळसेवा), आरोग्य सेवक (पुरुष) (५०% हंगामी फवारणी कर्मचारी), आरोग्य सेविक (महिला), औषध निर्माता या संवर्गाकरिता आवेदनपत्र/अर्ज सादर केलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांव्यतिरिक्त इतर प्रवर्गातून अर्ज सादर केलेले उमेदवार संबधित प्रवर्गातून परीक्षेकरिता पात्र राहतील.

५) मा.सर्वोच्च न्यायालयाने विषेश अनुज्ञा याचिका क्र. १५७३७/२०१९ व इतर याचिकांमध्ये शासकीय नोक-यांमधील नियुक्त्यांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (SEBC) आरक्षण रद्द ठरविले आहे. सामान्य प्रशासन विभागाने सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा लाभ

देण्याबाबत क्र.राआधो-४०१९/प्र.क्र. ३१/१६-अ, दिनांक २३ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गातून (EWS) आरक्षणाचा लाभ घेणे ऐच्छिक असेल. या अनुषंगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवाराने आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गातून (EWS) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावर **दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक १४ सप्टेंबर, २०२१** या कालावधीत विकल्प दयावेत. उमेदवाराने एकदा दिलेल्या विकल्पामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तथापि, ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवाराने आर्थिकदृष्टया मागास (EWS) प्रवर्गाचा विकल्प दिला आहे. त्याने परिक्षेपूर्वी सक्षम अधिका-याचे आर्थिदृष्टया मागास (EWS) प्रवर्गाचे प्रमाणपत्र जिल्हा निवड समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परिक्षेच्या दिनांकानंतर सादर केले जाणारे आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे (EWS) प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

६) जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देतील ते उमेदवार अथवा जे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) प्रवर्गातील उमेदवार आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचा विकल्प सादर करणार नाहीत. तथापि, खुल्या प्रवर्गातील वयोमर्यादेकरिता पात्र आहेत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार म्हणून गणण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गासाठी लागु असलेले परिक्षा शुल्क (यापुर्वी एसईबीसी प्रवर्गातून अदा केलेली रक्कम वगळता उर्वरित रक्कम) परिक्षेपुर्वी अदा करणे आवश्यक राहील. सदर उमेदवारांनी दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक १४ सप्टेंबर २०२१ या कालावधीत वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावरुन शुल्क अदा करण्याचे उपलब्ध पर्याय वापरुन शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

७) माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनूसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परीक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत, अशा उमेदवारांनी परिक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरील प्रमाणे नमूद संकेतस्थळावर दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

**तसेच, अनुकंपा नियुक्ती व इतर कारणांमुळे माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीतील काही प्रवर्ग रद्द झाले आहेत. त्याबाबतचा तपशील पुढिल प्रमाणे आहे :-**

८) माहे मार्च, २०१९ मध्ये आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत आरोग्य सेवक (पुरुष) ४०% सरळसेवा या पदाकरिता वि.जा.अ.-०१ पद, ई.डब्युएस.- ०२ पदे, एसईबीसी या प्रवर्गाकरिता - ०३ पदे, इ.मा.व. - ०४ पदे व वि.मा.प्र.- ०१ पद अशी एकुण ११ पदे जाहिरातीत दर्शविण्यात आली होती. तथापी उपसचिव, ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२० अन्वये जाहिरातीमधील पदे अनुकंपा भरतीने भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, दिनांक १४ जुन २०२१ अन्वये माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील एसईबीसी प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आलेली पदे अराखीव प्रवर्गात रुपांतरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अनुकंपा भरती - २०२० अतंर्गत आरोग्य सेवक (पुरुष) ४०% सरळसेवा या पदाकरिता वि.जा.अ.- ०१ पद, ई.डब्ल्यु.एस. - ०२ पदे व एसईबीसी या प्रवर्गाची पदे खुल्या प्रवर्गात रुपांतरीत करुन खुला प्रवर्ग - ०३ पदे अशी एकुण ०६ पदे अनुकंपा भरती - २०२० अंतर्गत भरण्यात आली असल्याने सदर प्रवर्गाची पदे जाहिरातीमधुन रद्द झाली आहेत. त्यामुळे सदर प्रवर्गातंर्गत माहे मार्च, २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवाराने संबधित

प्रवर्गातून www.maharddzp.com या संकेतस्थळावर इतर जिल्हा परिषदेचा विकल्प दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ ते दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक आहे. उर्वरित ०५ पदांची सुधारित जाहिरात जाहिर प्रकटणामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. याबाबत सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

तसेच माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील औषध निर्माता या पदासाठी इ.मा.व. - ०१ पद, एसईबीसी - ०१ पद, खुला - ०२ पदे अशा एकुण ०४ पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.उक्त नमुद शासन संदर्भानुसार अनुकंपा भरती - २०२० अतंर्गत औषध निर्माता या संवर्गातील खुल्या प्रवर्गातील एक पद अनुकंपा भरती - २०२० अतंर्गत भरण्यात आले आहे. तसेच एसईबीसी या प्रवर्गाचे ०१ पद खुल्या प्रवर्गात रुपांतरीत करण्यात येऊन उर्वरित ०३ पदांची सुधारित जाहिरात जाहिर प्रकटणामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. याबाबत सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

९) अवर सचिव, ग्रामविकास विभाग. मंत्रालय मुंबई ४००००१ यांचे पत्र क्रमांक संकीर्ण - २०२०/प्र.क्र.९९/आस्था-८/ दिनांक २५/०६/२०२१ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्गाचे (SEBC) आरक्षण रद्द झाले असल्याने सदर प्रवर्गातील राखीव जागा अराखीव जागेमध्ये रुपांतरित झाले असल्यामुळे खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणामध्ये वाढ किंवा घट होत आहे. त्यानुसार माहे मार्च, २०१९ मध्ये जिल्हा परिषद, हिंगोली अतंर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील आरोग्य सेवक (महिला) या पदाकरिता नमुद पदांमध्ये खुल्या प्रवर्गातील पदांपैकी समांतर आरक्षणामध्ये ०१ पद खेळाडूंसाठी वाढले आहे, ०३ पदे माजी सैनिकांसाठी वाढले आहेत, ०१ पद प्रकल्पग्रस्तासांठी वाढले आहे., ०१ पद भूंकपग्रस्तांसाठी नव्याने वाढले आहे, ०२ पदे अशंकालीन उमेदवारांसाठी वाढले आहेत. तसेच आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी कर्मचारी या पदाकरिता नमुद पदांमध्ये माहे मार्च, २०१९ मध्ये दिलेल्या जाहिरातीमधील खुल्या प्रवर्गातील पदांपैकी समांतर आरक्षणामध्ये ०१ पद माजी सैनिकांसाठी नव्याने वाढले आहे. सदर समांतर आरक्षणातील बदलामुळे वाढलेल्या प्रवर्गाच्या उमेदवाराने यापुर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गात अर्ज सादर केला असल्यास त्यास नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गाचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

१०) नव्याने समाविष्ट झालेल्या दिव्यांगाच्या प्रवर्गातील उमेदवाराने जर यापूर्वी माहे मार्च, २०१९ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनूसार खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारास दिव्यांग आरक्षणाचा विकल्प देणे आवश्यक असेल. तसेच यापूर्वी अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी दिव्यांगाच्या पदनिहाय आरक्षणात बदल होत असल्याने दिव्यांगाकरिता नव्याने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार विकल्प देणे आवश्यक आहे.

११) यापूर्वी उमेदवारांकडून लेखी परीक्षेस प्रत्यक्ष कोणत्या परीक्षा केंद्रामधून परीक्षा देणार आहे, त्या परीक्षा केंद्राबाबत प्राथम्यक्रम घेण्यात आले होते. सदर प्राथम्यक्रमानुसार उमेदवारास संबधित जिल्हयातुन परिक्षेस बसण्याबाबत प्रवेशपत्र पाठविण्यात येईल.

१२) माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीनूसार ऑनलाईन परिक्षेकरिता एका पदाकरिता एकापेक्षा जास्त जिल्हा परिषंदाकरिता अर्ज केलेलया उमेदवारांनी सर्व ठिकाणी परीक्षा शुल्क भरलेले आहे. तथापि, उमेदवारांना एकाच ठिकाणी परीक्षा देता येणार असल्याने संबधित उमेदवारांनी भरलेले अधिकचे परीक्षा शुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी वरीलप्रमाणे नमूद संकेतस्थळावर आवश्यक बँक तपशील नमुद करणे आवश्यक आहे.

१३) दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदांवर दिव्यांग व्यक्तीस गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांच्यासाठी पद आरक्षीत नसले तरी नियुक्तीसाठी अपात्र ठरणार नाही. जर दिव्यांग उमेदवाराचे इतर उमेदवाराप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षीत जागेवर करण्यात येणार नाही व दिव्यांगासाठी आरक्षीत पदे / पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येतील.

१४) विकल्प नोंदवितांना काही अडचणी उदभवल्यास उमेदवारांनी ०७२९२००६३०५ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१५) वरील प्रमाणे भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार शासन स्तरावर राखून ठेवण्यात येतील.

सदरील जाहिरातीच्या अनुषंगाने औषध निर्माता, आरोग्य सेवक (पुरुष) ४०% सरळसेवा, आरोग्य पुरुष (५०% हंगामी फवारणी कर्मचारी), आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील पदभरती करिता संबधित सर्व उमेदवारांनी पुढिल वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक (कालावधी) |
|---|---|---|
| ०१ | **माहे मार्च, २०१९ मध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांबाबत :-**<br>०१) एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडून जिल्हाचा विकल्प घेणे.<br>०२) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या (SEBC) उमेदवारांकडून विकल्प प्राप्त करुन घेणे.<br>०३) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (SEBC) उमेदवारांकडून प्राप्त विकल्पानुसार खुल्या प्रवर्गाचा विकल्प देणा-या/ खुल्या प्रवर्गात गणना होणा-या खुल्या प्रवर्गासाठीच्या वयोमर्यादेत पात्र होणा-या एसईबीसी उमेदवारांकडून परिक्षा शुल्क आकारणे<br>०४) ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास उमेदवारांनी ईब्ल्युएस प्रवर्गाचा विकल्प दिला आहे त्यांच्याकडून ईडब्लुएस प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे.<br>०५) दिव्यांगाच्या आरक्षणात बदल होत असल्याने अर्ज सादर केलेल्या दिव्यांग उमेदवारांकडून नव्याने निश्चीत केलेल्या दिव्यांग आरक्षणानुसार विकल्प घेणे<br>०६) नव्याने समाविष्ट दिव्यांग उमेदवाराने यापूर्वी खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास सदर उमेदवारांकडून दिव्यांग आरक्षणाचा विकल्प घेणे. | दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक १४ सप्टेंबर २०२१ |
| ०२ | नव्याने समाविष्ट दिव्यांग तसेच नव्याने वाढलेल्या खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणामधील रिक्त जांगासाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविणे | दिनांक ०१ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक २१ सप्टेंबर २०२१ |
| ०३ | पात्र उमेदवारांचे परिक्षा प्रवेशपत्र तयार करुन संबधित उमेदवारांना डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करुन देणे. | दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ ते दिनांक १५ सप्टेंबर २०२१ |
| ०४ | परिक्षेचे आयोजन - औषध निर्माता (दुपारी ०३.०० ते ०५.००) | दिनांक १६ ऑक्टोंबर २०२१ |
| ०५ | आरोग्य सेवक (पुरुष) ४०% सरळसेवा (सकाळी ११.०० ते ०१.००)<br>आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी कर्मचारी (सकाळी ११.०० ते ०१.००)<br>आरोग्य सेवक (महिला) (दुपारी ०३.०० ते ०५.००) | दिनांक १७ ऑक्टोंबर २०२१ |
| ०६ | लेखी परिक्षेनंतर Answer Key प्रसिध्द करणे/उमेदवारांना Objection filing साठी किमान ३ दिवसांचा वेळ देणे/अंतिम निकाल जाहिर करणे/पात्र उमेदवारांची यादी जाहिर करणे व त्या अनषंगाने नियुक्ती आदेश देणे | दिनांक १८ ऑक्टोंबर २०२१ ते दिनांक ०१ नोंव्हेंबर २०२१ |

| (सदस्य सचिव) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
|---|---|---|
| **जिल्हा आरोग्य अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी,** | **जिल्हा निवड समिती,** |
| जिल्हा परिषद, हिंगोली | जिल्हा परिषद, हिंगोली | तथा जिल्हाधिकारी, हिंगोली |

* * * * * * *